# पनवेल महानगरपालिका शिक्षण विभाग

शिक्षण विभाग, लोकनेते दि.बा.पाटील विद्यालय,आगरी समाज
हॉल व दांडेकर हॉस्पिटल समोर,पनवेल – ४१० २०६.

Email - msbpanvel1993@gmail.com    Email :panvelcorporation@gmail.com


जा.क्र.पमपा/शिक्षण/ आस्था -१/ ५०४/ २०२६    दिनांक - २२ /०९/२०२६

प्रति,
विभाग प्रमुख
माहिती व तंत्रज्ञान विभाग,
पनवेल महानगरपालिका.

विषय :- :-"हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे नागरी लोककल्याण अभियान" अंतर्गत पनवेल महानगरपालिका शिक्षण विभागामार्फत मराठी शाळांची दर्जोन्नती / गुणवत्ता सुधारणाविषयक प्रस्तावित एकूण १२ कामे राबविण्याकरीता बाजारभावासाठी दरपत्रके मागविणेबाबत.

उपरोक्त विषयान्वये हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे नागरी लोककल्याण अभियान" अंतर्गत पनवेल महानगरपालिका शिक्षण विभागामार्फत मराठी शाळांची दर्जोन्नती / गुणवत्ता सुधारणाविषयक प्रस्तावित एकूण १२ कामे राबविण्याकरीता बाजारभावासाठी दरपत्रके मागविणेबाबत जाहीर नोटीस पमपा/ शिक्षण/ I /२४८३८३७/ २०२६ ची सुचना दि. २३/०९/२०२६ रोजीच्या मनपाच्या www.panvelcorporation.com या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावे. तरी याबाबतची जाहीर नोटीस मसुदा सोबत जोडला आहे.
सोबत:- जाहीर सूचना.

मा. उपायुक्त यांचे मान्यतेने

(रमेश उ. चव्हाण)
शिक्षणाधिकारी
पनवेल महानगरपालिका

# पनवेल महानगरपालिका शिक्षण विभाग

लोकनेते दि.बा.पाटील विद्यालय,आगरी समाज हॉल व दांडेकर
हॉस्पिटल समोर,पनवेल- ४१० २०६.

Email - msbpanvel1993@gmail.com Email :panvelcorporation@gmail.com

## जाहीर सूचना

उपरोक्त विषयाचे अनुषंगाने संदर्भीय शासन निर्णयातील विषयानुसार पनवेल महानगरपालिका शिक्षण विभागामार्फत महानगरपालिका शाळांची शैक्षणिक गुणवत्ता, विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध सुविधा, वाचन संस्कृती, खेळ व व्यायाम, स्वच्छ व आकर्षक शैक्षणिक वातावरण तसेच शिक्षक व विद्यार्थ्यांचे कौशल्यविकास यामध्ये सुधारणा करण्याच्या उद्देशाने एकूण १२ कामे प्रस्तावित करण्यात आलेली आहेत. सदर कामे "हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे नागरी लोककल्याण अभियान" अंतर्गत राबविण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे.

सदर प्रस्तावित कार्यक्रमासाठी अंदाजित खर्च निश्चित करण्याच्या दृष्टीने इच्छुक निविदाधारक / नोंदणीकृत संस्था यांचेकडून खालील तपशीलानुसार बाजारभावासाठी दरपत्रके मागविण्यात येत आहेत.

| अ.क्र. | मुख्य बाब | कामाचे नाव / तपशील | प्रमाण / नग | दर (GST) सह |
|---|---|---|---|---|
| १ | वाचनालय / वाचन संस्कृती वाढवणे | "एक वर्ग - एक वाचन कोपरा" उपक्रम - प्लास्टिक कपाट (निलकमल) व बालसाहित्य, Dictionary, कोडी, GK व अनुषंगिक पुस्तके | 1 सेट | |
| २ | खेळ आणि व्यायाम | बॅडमिंटन संच | 1 सेट | |
| ३ | खेळ आणि व्यायाम | बुद्धिबळ संच | 1 सेट | |
| ४ | खेळ आणि व्यायाम | कॅरम संच | 1 सेट | |
| ५ | खेळ आणि व्यायाम | दोर उड्या | 1 सेट | |
| ६ | खेळ आणि व्यायाम | फुटबॉल संच | 1 सेट | |
| ७ | खेळ आणि व्यायाम | बॅट-बॉल संच | 1 सेट | |
| ८ | खेळ आणि व्यायाम | योगा मॅट | 1 सेट | |
| ९ | खेळ आणि व्यायाम | बौद्धिक खेळ - पहिली ते दुसरी | 1 सेट | |
| १० | खेळ आणि व्यायाम | बौद्धिक खेळ - तिसरी ते चौथी | 1 सेट | |
| ११ | खेळ आणि व्यायाम | बौद्धिक खेळ - पाचवी ते सहावी | 1 सेट | |
| १२ | खेळ आणि व्यायाम | बौद्धिक खेळ - सातवी ते आठवी | 1 सेट | |

इच्छुक निविदाधारक/नोंदणीकृत संस्थांनी सदरचे दरपत्रक **दि. २३.०९.२०२६ ते दि. २९.०९.२०२६ रोजी सायं. ४.०० वाजेपर्यंत** पनवेल महानगरपालिकेच्या **शिक्षण विभागाकडे, लोकनेते दि. बा. पाटील विद्यालय,**

**दांडेकर हॉस्पिटल समोर, पनवेल** येथे समक्ष सादर करावे. व प्राप्त दरपत्रके शक्यतो दि.२९.०९.२०२६ रोजी सायं.४.०० नंतर उघडण्यात येतील. वरील दिनांकानंतर प्राप्त झालेली दरपत्रके विचारात घेतली जाणार नाहीत.

अटी व शर्ती -

१. नमूद केलेले दर हे सर्व प्रकारच्या वाहतूक खर्चासह समाविष्ट असावेत.
२. इच्छुक निविदाधारक/संस्थांनी प्रत्येक घटकाचा बाजारभाव स्वतंत्रपणे व स्पष्टपणे नमूद करावा.
३. याकामी अधिकची माहिती हवी असल्यास शिक्षण विभाग, पनवेल महानगरपालिका यांच्याशी संपर्क साधावा.
४. नमूद केलेले दर हे सर्व प्रकारच्या वाहतूक खर्चासह समाविष्ट असावेत.

सदर दरपत्रक हे केवळ **बाजारभाव निश्चित करण्याच्या उद्देशाने** मागविण्यात येत असून, त्याआधारे कोणतेही काम देण्याचे बंधन पनवेल महानगरपालिकेवर राहणार नाही.

सही/-

**उपायुक्त (शिक्षण)**
**पनवेल महानगरपालिका**